मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/ ३३८३ /०२

श्री.विक्रम शामा शेट्टी
हॉटेल श्री लक्ष्मीशा बार अॅन्ड रेस्टॉरन्ट
शॉप नं. १० ओ.पी.नं.८५ ------- अपीलकार
२२, अभयचंद गांधी माग,
मस्जिदबंदर मुंबई ४०० ६०१

विरूध्द

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपसचिव
राज्य उत्पादन शुल्क,गृह विभाग, मंत्रालय,मुंबई.३२

जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
राज्य उत्पादन शुल्क,गृह विभाग, मंत्रालय,मुंबई.३२ --उत्तरवादी

## -विवेचन-

श्री.विक्रम शामा शेट्टी यांनी आयोगाकडे दि.३१.१२.२००७ रोजी जे व्दितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दिनांक २.१.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपीलकर्ते व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

अर्जदारानी त्यांचा एक अर्ज मा.राष्ट्रपती यांचेकडे पाठविला होता व तो अर्ज मा.राष्ट्रपती यांच्या कार्यालयाने मुख्य सचिवांकडे पाठविला होता. त्यावर काय कार्यवाही झाली, याची माहिती अर्जदारास पाहिजे होती. या संबंधीची माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील सादर केले. दरम्यान अर्जदारास माहिती देण्यांत आली होती. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे आदेशाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न देण्याचे कारण श्री.शेट्टी यांचे एफएल-२ लायसन्सबाबतचे प्रकरण ते सुप्रीम कोर्टात हरल्याने त्यांच्या अर्जावर कार्यवाहीची आवश्यकता नसून प्रकरण दप्तर दाखल करण्याचा निर्णय झाला व त्यानुसार श्री.शेट्टी यांना

उत्तरही देण्यांत आले.   मात्र माहिती अधिकारात श्री. शेट्टी यांच्या अर्जास उत्तर देण्याचे राहून गेले होते.  माहिती न देण्यामागे कोणताही वैयक्तिक हेतू नव्हता.

अर्जदाराच्या मा.राष्ट्रपती कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या अर्जावर करण्यांत आलेल्या कार्यवाहीची माहिती मा.राष्ट्रपती कार्यालयास देण्यात आलेली आहे व ही सर्व वस्तुस्थिती अर्जदारास कळविण्यांत आलेली आहे. त्यामुळे प्रथम अपीलाच्या आदेशात काही बदल करावा अशी परिस्थिती नाही.  सबब पुढील प्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

आ दे श

अपील अमान्य करण्यांत  येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक  २ जानेवारी  २००९

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेले तक्रार.**

**तक्रार क्रमांक २००८/ ५६/०२**

**श्री.महेश जयंतीलाल वोरा**
**३०१/सुरुची , सहकारी गृहनिर्माण संस्था (म)**
**मित्तल कॉलेज जवळ, भंडारवाडा** ------- **तक्रारदार**
**मालाड (प),मुंबई ४०० ०६४**

**विरूद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा**
**बृहन्मुंबई महानगरपालिका,** **--उत्तरवादी**
**पी/उत्तर विभाग, मामलतदार वाडी,**
**लिबर्टी गार्डन, मालाड (प), मुंबई ४०० ०६४**

-विवेचन-

अपिलकर्ते श्री. महेश ज. वोरा मुंबई यांनी आयोगाकडे दि.१३.१०.२००८ रोजी तक्रार दाखल केली आहे की, आयोगाने दि.३० सप्टेंबर २००८ रोजी आदेश देऊनही त्यांना योग्यती माहिती देण्यांत आलेली नाही. दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेऊन पुढील आदेश देण्यांत येत आहेतः-

**जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे अर्जदारास माहिती दिली आहे. अर्ज़दाराचे म्हणणे त्यांना महापालिकेच्या दराप्रमाणे पैसे भ्ररण्यास लिहिण्यांत आले आहे. दि.३० सप्टेंबर २००८ रोजीच्या आयोगाच्या आदेशामध्ये जी माहिती विना मूल्य देण्यांत यावी असे आदेश आहेत, ती विनामूल्य देण्यांत यावी. जन माहिती अधिकारी नविन असल्याने या आधी माहिती विनामुल्य देण्यांत आली आहे किंवा नाही याची त्यांनी खात्री करुन घ्यावी. तसेच इतर काही माहिती अर्जदारास अजून पाहिजे असेल तर जर नस्त्या (फोटोकॉपी सारखे)साध्या कॉपीचे दर महापालिकेने दि.१२.१०.२००५ रोजी ठरविले**

असतील तर  व त्या ठरविले नसतील तर रुपये २/-प्रतिपेज प्रमाणे तसेच सर्टिफाईड कॉपीसाठी महापालिकेचे दराप्रमाणे चार्जेस लावण्यांत यावेत व माहिती देण्यांत यावी. वरील कार्यवाही ही १५ दिवसामध्ये पूर्ण करण्यात यावी.

**आ दे श**

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)

दिनांक १९ जानेवारी २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/ २५४३/०२

श्री.रामचंद्र आर.सिंग,
१२, तिरुपती अपार्टमेंट
देवीदयाल रोड, मुलूंड(प) -- अपीलकार
मुंबई. ८०

विरूद्ध

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपसंचालक --उत्तरवादी
शिक्षण विभाग मुंबई,
जवाहर बालभवन यांचे कार्यालय,
चर्नी रोड (प),मुंबई.

जन माहिती अधिकारी थिा शिक्षण उपनिरिक्षक
बृहन्मुंबई उत्तर विभाग यांचे कार्यालय,
चेंबूर (पूर्व), मुंबई ७१

## -विवेचन-

श्री. रामचंद्र आर.सिंग, मुंबई यांनी माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ अंतर्गत आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपिलावर दि.७.८.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली होती. सुनावणीला अपीलकार व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

श्री. रामचंद्र आर.सिंग यांनी दयानंद वैदिक विद्यालय,मुलूंड ही शाळा अनधिकृतपणे संगणक फी व परीक्षा फी आकारत असल्यासंदर्भात शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय यांच्याकडे माहिती मागितली होती. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने सदर माहिती शिक्षण उपासंचालक,मुंबई विभाग, मुंबई यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याविषयी अर्जदाराला कळविले. उपसंचालक (शिक्षण)मुंबई कार्यालयाच्या जन माहिती अधिका-यांकडून शालेय शिक्षण क्रीडा विभागाच्या पत्राच्या अनुषंगाने वर नमूद शाळेच्या मुख्याध्यापकावर काय कार्यवाही झाली याची माहिती न मिळाल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय प्राधिका-यानीही प्रथम अपीलावर आदेश पारित न केल्याने त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे.

तथापि अपीलकाराच्या माहिती अर्जातील विषयाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.८.५.२००७ च्या पत्रान्व्ये अपीलकाराला सविस्तर माहिती दिलेली आहे व तयाची एक प्रत जन माहिती अधिकारी यांनी आयोगालाही सादर केली आहे. म्हणजे अपीलकारांला माहिती पुरविण्यांत आली आहे हे स्पष्ट होते.

मात्र यापुढे जन माहिती अधिकारी यांनी माहितीच्या अर्जावर सत्वर व विहित मुदतीत कार्यवाही करण्याची व प्रथम अपीलीय प्राधिका-यानी यांच्याकडे दाखल होणा-या प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन आदेश पारित करण्याची दक्षता घ्यावी. अशी त्यांना समज देण्यांत येत आहे.

अपीलकाराला जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविली असल्याने सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## आ दे श

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ३१ डिसेंबर २००८

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००८/ ३५५७/०२**

**श्री.प्रकाश पंजूमल कुकरेजा,**
**६०६ नवजीवन टॉवर**
**जसलोक स्कूल समोर ओ.टी.सेक्शन,** **अपीलकार**
**उल्हासनगर-४२१ ००३**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा संचालक(माहिती)(वृत्त जनसंपर्क)** **--उत्तरवादी**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**मंत्रालय,मुंबई ४०० ०३२**
**जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**मंत्रालय,मुंबई ४०० ०३२**

## -विवेचन-

श्री. प्रकाश कुकरेजा यांना दि.१ जुलै ३००८ च्या अर्जानुसार श्री. हरी तनवाणी,संपादक साप्ताहिक, मेहरान सिंधी, उल्हासनगर यांना अधिस्वीकृती पत्रिका पुर्नजिवित केली किंवा कसे या संबंधी माहिती पाहिजे होती. ही माहिती दिल्याने कोणतेही व्यापक जनहित साध्य होत नाही असे नमूद करुन अधिनियमाच्या कलम ८(घ) (ङ) (छ)अन्वये सदरील माहिती नाकारण्यांत आली व हाच निर्णय प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कायम केला आहे.

राज्य माहिती आयोगाकडे अर्जदाराने दि.२२.९.२००८ रोजी सादर केलेल्या अपिलाची सुनावणी दि. २०.१.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलकर्ते अनुपस्थित होते. अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदार श्री.कुकरेजा व श्री.तनवाणी यांच्यामधील वैमनस्य हे माहिती न देण्यामध्ये एक कारण दिलेले आहे असे जरी असले तरी एखाद्या वृत्त पत्रकारास अधिस्विकृती कां नाकारण्यांत आली ही माहिती जनतेला होणे आवश्यक आहे. राज्य समितीने ज्या कारणामुळे श्री. तनवाणी यांना अधिस्विकृती पत्रिका देण्यास किंवा पुर्नज्जिवित करुन देण्यास नकार दिला असेल त्याची कारणे अर्जदारस कळवावी.

## आ दे श

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे. अर्जदारास वरील माहिती १० दिवसाचे आंत कळवावी.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
**दिनांक २० जानेवारी २००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/ ३५५९/०२

श्री.गंगाबाई अरुण कोळी
बी-७, आदी जनता को.ऑ.हौ.सोसायटी
सायन, मुंबई ४०० ०२२ -- अपीलकार

विरूद्ध

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहाय्यक मनपा आयुक्त --उत्तरवादी
बृहन्मुंबई मनपा कार्यालय,
एफ/उत्तर यांचे कार्यालय, ९६, भाऊ दाजी रोड,
माटूंगा मुंबई ४०० ०१९

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी (मालमत्ता)
बृहन्मुंबई मनपा कार्यालय,
एफ/उत्तर यांचे कार्यालय, ९६, भाऊ दाजी रोड,
माटूंगा मुंबई ४०० ०१९

-विवेचन-

श्रीमती गंगाबाई अरुण कोळी यांनी आयोगाकडे दि.२७ ऑगस्ट २००८ रोजी जे व्दितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दिनांक २०.१.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलकर्ते व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

अर्जदाराची माहिती मागणी, रुम नं.१ चाळ नं.९ एन.एस.पी. शेड,सायन कोळीवाडा यावर त्यांचे नांव लावण्यासंबंधीची आहे व याबाबत जी सद्यःस्थितीतील माहिती आहे ती जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास दि.२४.४.२००८ रोजीच्या पत्राने दिलेली आहे. याबाबत केलेला अपिल अर्ज हा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी निकाली काढलेला आहे. जन माहिती अधिकारी तसेच अपिलीय अधिकारी यांच्या आदेशावरुन संबंधित कागदपत्राची सद्यःस्थितीतील माहिती अर्जदारास दिल्याचे दिसून येते. याउपरही अर्जदारास काही कागदपत्रे पाहून त्यातील काही कागदपत्र प्राप्त करुन घ्यावयाची असतील तर ते घेऊ शकतात. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

आ दे श

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २० जानेवारी २००८

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/ ३५५८/०२

श्री.खलील अहमद नवाब अली सुभेदार
जी-२३, महिंद्र पार्क, एल.बी.एस.रोड
घाटकोपर (प)मुंबई ८६ -- अपीलकार

विरूद्ध

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहाय्यक मनपा आयुक्त --उत्तरवादी
बृहन्मुंबई मनपा कार्यालय,
एम/इस्ट यांचे कार्यालय, चेंबूर मुंबई

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी (मालमत्ता)
बृहन्मुंबई मनपा कार्यालय,
एम/इस्ट यांचे कार्यालय, चेंबूर मुंबई ८६

-विवेचन-

श्री. खलील अहमद नवाब अली सुभेदार यांनी आयोगाकडे दि.५.९.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केले. त्या अपीलाची सुनावणी दि.२०.१.२००९ रोजी घेण्यांत आली अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदाराला वॉर्ड क्र.१२९ मध्ये अनधिकृतरित्या बांधकाम जमिनदोस्त करण्याबाबतच्या कार्यवाहीसंबंधी माहिती पाहिजे होती. अर्जदाराने जवळपास रु.४०००/- भरुन माहिती घेतलेली आहे. अर्जदाराचे समाधान न होण्याचे कारण हे की, त्यांच्या म्हणण्यानुसार वाणिज्यिक वापराच्या दुरुस्तीची परवानगी देत नाहीत हे होय. याबाबत जन माहिती अधिकारी यांनी जे कागदपत्र दाखविले त्यावरुन महापालिकेची पॉलीसी ही निवासी उपयोगासाठी असलेल्या बांधकामाच्या दुरुस्तीसंबंधीची आहे परंतू त्यात वाणिज्यिक वापराचा उल्लेख नाही. अशा परिस्थितीत अर्जदाराने महापालिकेच्या वरिष्ठाकडे याबाबत आपली मागणी करणे योग्य ठरेल. जन माहिती अधिकारी यांनी सुध्दा त्यांच्या वरिष्ठ अधिका-याकडे योग्यते मार्गदर्शन मागवावे. उपलब्ध कागदपत्र अर्जदाराने सुध्दा पाहून घेतलेले असल्याने पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

आ दे श

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २० जानेवारी २००८

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/ ३५६०/०२

श्री.वामन विष्णू चव्हाण
७६/ई, लोकोत्कर्ष भवानी गेट,
मंगल सोसायटी जवळ,र.अ.किडवाई मार्ग -- अपीलकार
माटूंगा, मुंबई १९

विरूद्ध

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहाय्यक मनपा आयुक्त --उत्तरवादी
बृहन्मुंबई मनपा कार्यालय,
एफ/उत्तर यांचे कार्यालय, भाऊदाजी रोड,माटुंगा, मुंबई

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता
बृहन्मुंबई मनपा कार्यालय,
एफ/उत्तर यांचे कार्यालय, भाऊदाजी रोड माटूंगा मुंबई ८६

-विवेचन-

श्री. वामन चव्हाण यांनी आयोगाकडे दि.१० सप्टेंबर २००८ रोजी दाखल केलेल्या अपिलाची सुनावणी दि.२०.१.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

अर्जदारास पुढीलप्रमाणे माहिती पाहिजे होती :-

अर्जदाराने मागितलेली माहिती म्हणजेच मंगल सहकारी गृहनिर्माण संस्था, लोकात्कर्ष वाचनालय व पान विडी जन, शॉप या कायमस्वरुपी बांधकाम - इमारतीबाबत १. भूकर क्र. २. प्रस्ताव मंजूर झालेली तारीख ३. प्रस्ताव मंजूरीचे कारण ४. इमारत व प्रस्ताव (शहर)यांनी मंजूर केलेला आराखडा ५. मंजूरीपत्र व करारपत्रबाबत प्रमाणित नक्कल प्रत ६. बांधकाम कायदेशीर असल्यास कारवाई अशी आहे.

याबाबत सी.टी. सर्व्हे नंबर उपलब्ध नाही तसेच अर्जदारास हवी असलेल्या मंगल सहाकारी गृहनिर्माण संस्थेचे बांधकाम ५० वर्षापूर्वीचे जुने असल्यामुळे याबाबतचे अभिलेख उपलब्ध होऊ शकत नसल्यामुळे मागितलेली माहिती देता येत नाही असे उपप्रमुख अभियंता

यांचे म्हणणे आहे.  त्यामुळे अर्जदारास हवी असलेली माहिती उपलब्ध होऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. अर्जदारास पानविडी जन.शॉप संबंधी जी माहिती पाहिजे आहे ती संबंधित वॉर्ड विभागाने १० दिवसाचे आत द्यावी.  त्यामुळे पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

**आ दे श**

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी  पानविडी जन शॉप संबंधीची माहिती द्यावी.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक  २० जानेवारी  २००८

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/ ३५६१/०२

श्री.शशिकांत रामचंद्र पाटील
म्युनि.चाळ ४५ के.एफ खोली क्र.३
लालबांग मासळी, मार्केट -- अपीलकार
श्री.गणेश नगर मुंबई १२

विरूद्ध

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहाय्यक मनपा आयुक्त --उत्तरवादी
बृहन्मुंबई मनपा कार्यालय,
एफ/दक्षिण यांचे कार्यालय, परेल, मुंबई

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता
बृहन्मुंबई मनपा कार्यालय,
एफ/दक्षिण यांचे कार्यालय, परेल, मुंबई ८६

-विवेचन-

श्री. शशिकांत रामचंद्र पाटील, लालबाग यांनी आयोगाकडे दि.१५.१.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केले. अपिलाची सुनावणी दिनांक २०.१.२००९ रोजी घेण्यांत आली. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदाराचा मुळ अर्ज हा जिल्हाधिकारी मुंबई शहर तथा जिल्हा भ्रष्टाचार निमुर्लन समिती यांच्याकडे जी तक्रार केली होती त्या तक्रारीच्या संबंधिचा जो अहवाल महापालिकेच्या अधिका-यांना पाठविला त्या अहवालाची प्रत पाहिजे होती. ती प्रत अर्जदारास देण्यांत आलेली आहे. अर्जदाराच्या दुस-या मुद्दयाबाबत प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळेला जे अधिकारी उपस्थित होते त्यांच्यात श्री.राणे यांच्या नावाचा उल्लेख नाही. मात्र सहाय्यक आयुक्त यांनी अर्जदारास वेगळयाने पत्र लिहून सुनावणीच्या वेळी जे संबंधित अधिकारी असतील त्यांच्या सहया घेतलेल्या आहेत. मात्र श्री.राणे संबंधित अधिकारी नसल्याने त्यांच्या नावाचा समावेश करण्यांत आलेल नाही असे कळविले आहे.

जिल्हाधिकारी यांनी पाठविलेल्या अहवालामध्ये पाणी पुरवठा सुरळीत झाल्याचा उल्लेख आहे. मात्र अर्जदाराचे म्हणणे संबंधित प्लंबर विरुध्द कार्यवाही व्हावी असा आहे. याबाबत अर्जदाराने वेगळयाने पाठपुरावा करावा. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

<u>आ दे श</u>

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २० जानेवारी २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/ ३५६२/०२

श्री.विशाल रा. भोगे
रु.न.३०६,बिल्डिंग नं.१०१
न्यू महाडा कॉलनी,. -- अपीलकार
डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर,
मानखुर्द, मुंबई ४३

विरूध्द

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त --उत्तरवादी
परिमंडळ-६ ४ था मजला, प्रशासकिय इमारत,
चेंबूर, मुंबई ४०००७१

जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलिस आयुक्त,
चेंबूर पोलिस ठाणे, चेंबूर, मुंबई ७१

## -विवेचन-

श्री.विशाल रा.भोगे, यांनी आयोगाकडे दि.११.९.२००८ रोजी व्दितीय अपिल सादर केले त्या अपिलाची सुनावणी दि.२०.१.२००९ रोजी घेण्यांत आली. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

श्री. भोगे यांनी सहायक पोलिस आयुक्त, चेंबूर विभाग यांनी १७१ चेंबूर विभाग हया खादयगृहाचे नोंदणी प्रमाणपत्र श्री.ॲन्थोनी सॅबेस्टीयन यांना दिलेले आहे. त्या संदर्भात गुमास्ता लायसन्स व महानगरपालिकचे अनुज्ञा पत्र या सर्वात विसंगती आहे किंवा नाही याचा खुलासा मागविलेला आहे. सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, याबाबत अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार सहाय्यक पोलस आयुक्त, चेंबूर विभाग,मुंबई यांचेकडून जो अहवाल प्राप्त झालेला आहे त्यानुसार या संदर्भात सर्व माहिती देण्यांत आलेली आहे. ती योग्य वाटते.सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे

## आ दे श

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
दिनांक २० जानेवारी २००८ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/ ३५६३/०२

श्री.प्रकाश बजाज
रा.ठी.८ हिमालय हाऊस,
७९, पलटन रोड, -- अपीलकार
मुंबई ४०० ००१

विरूद्ध

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त --उत्तरवादी
परिमंडळ-२ यांचे कार्यालय
सर जे.जे. मार्ग नागपाडा, मुंबई

जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलिस आयुक्त,
दक्षिण प्रोदशिक नियंत्रण कक्ष विभाग,मुंबई.

-विवेचन-

श्री.प्रकाश बजाज यांनी दि.९.३.२००७ रोजी व्दितीय अपील सादर केले होते. त्या अपीलाची सुनावणी दि.२०.१.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदारास श्री.रमेश बजाज यांना जे पोलिस संरक्षण देण्यांत आलेले आहे त्या संबंधी माहिती पाहिजे होती. सुनावणीच्या वेळेला असे सांगण्यांत आले की, पोलिस संरक्षण हे संवेदनाक्षम विषय असल्यामुळे ज्यांना पोलिस संरक्षण देण्यांत आलेले आहे त्या विषयीची माहिती ही पोलिस विभागाने देण्यास मनाई केलेली असल्यामुळे संरक्षणाच्या दृष्टीने प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती न देण्याचा निर्णय दि.३१.१.२००७ रोजीच्या आदेशाने घेतलेला आहे. सदर निर्णय मान्य करण्यांत येत आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

आ दे श

अपील अमान्य करण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २० जानेवारी २००९

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००८/ ३५६४/०२**

**श्री.संजयकुमार रामसेवक मौर्या**
**रु.न.३१/३६, डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर,**
**झोपडपटटी बूकबे बस डेपो पाठीमागे, -- अपीलकार**
**कफ परेड,कुलाबा,मुंबई ४०० ००५**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त --उत्तरवादी**
**परिमंडळ-२ यांचे कार्यालय**
**दक्षिण प्रादेशिक विभाग, नागपाडा,**
**भायखळा,मुंबई ४०० ०८**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलिस आयुक्त,**
**परिमंडळ-२ यांचे कार्यालय**
**दक्षिण प्रादेशिक विभाग, नागपाडा,**
**भायखळा,मुंबई ४०० ०८**

## -विवेचन-

**श्री.संजयकुमार रामसेवक मौर्या, यांनी आयोगाकडे दि.१९.९.२००८ रोजी जे व्दितीय अपील सादर केले त्या अपीलाची सुनावणी दि.२१.१.२००९ रोजी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**सुनावणीच्यावेळी वरिष्ठ पोलिस निरिक्षक आझाद मैदान, पोलिस ठाणे यांनी पुढीलप्रमाणे निवेदन सादर केले.**

**अर्जदार यांनी मा.सहा.पोलिस आयुक्त व शासकिय माहिती अधिकारी, दक्षिण प्रादेशिक विभाग, मुंबई यांना माहितीचा अधिकार अध्यादेश अन्वये दि.१४.५.२००८ रोजी अर्ज क्र.३९३/०८ अन्वये अर्ज केला होता. त्यावेळी अर्जदाराने कामा व आल्ब्लेस रुग्णालयाच्या डॉ.साधना तायडे यांचेविरुध्द सन २००६साली केलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या चौकशीची माहिती मागविली होती. त्यावेळी आझाद मैदान पोलिस इाणेचा उपलब्ध अभिलेख तपासला असता कामा व आल्ब्लेस रुग्णालयाच्या डॉ.साधना तायडे यांचेविरुध्द दखलपात्र अथवा अदखलपात्र गुन्हा नोंद नसल्याचे व तक्रारीचा अभिलेख मिळून येत नसल्याने या पोलिस ठाणेकडून जा.क्र.३७९७/०८ दि.१०.६.२००८ अन्वये मा.सहा.पोलिस आयुक्त व शासकीय माहिती अधिकारी, दक्षिण प्रादेशिक विभागक, मुंबई यांना कळविण्यांत आले होते.**

**कामा व आल्ब्लेस रुग्णालयाच्या डॉ.साधना तायडे यांचेविरुध्द आलेल्या तक्रारीचे चौकशी अधिकारी तत्कालीन सपोनि श्री.परशुराम काळे (सध्या नेमणुक -वाठार पोलिस ठाणे, जि.सातारा)यांनी सदर प्रकरणाची चोकशी कागदपत्रे पोष्टाव्दारे पाठविली ती या पोलिस ठाणेस दि.१.१७.२००८ रोजी**

प्राप्त झाली. त्यानंतर चौकशीच्या कागदपत्रावरुन अर्जदारास त्यांने केलेल्या अपिल अर्जास अनुसरुन या पोलिस ठाणेकडून जा.क्र. ६१५८ दि.४.८.२००८ रोजी मा.सहा.पोलिस आयुकत व शासकीय माहिती अधिकारी, दक्षिण प्रादेशिक विभाग, मुंबई यांना अहवाल सादर करण्यांत आला होता.

सदर प्रकरणाची चौकशी तत्कालीन चौकशी अधिकारी सपोनि श्री.परशुराम काळे (सध्या नेमणूक वाटार पोलिस ठाणे.जि.सातारा) हे करीत होते. तयांची बदली झाल्यानंतर सदर प्रकरणाची फाईल या पोलीस ठाणेस त्यांचेकडून दि.१.७.२००८ रोजी प्राप्त झाल्यापासून पोलीस उपनिरिक्षक श्री.बाबासाहेब कृष्णा देसाई यांना चौकशीसाठी देण्यांत आलेली आहे.

पोउनि श्री. देसाई यांनी दि.१५.९.२००८ रोजी मा.अधिष्ठाता, सर जे.जे.रुग्णालय,मुंबई यांची प्रत्यक्ष भेट घेऊन डॉ.साधना तायडे यांच्याविरुध्द नेमण्यांत आलेल्या समितीने काय चोकशी केली व काय निर्णय झाला याबाबत सविस्तर पत्र देउुन अहवाल मागितला असता त्यांनी नेमलेल्या तीन डॉक्टरांच्या समितीने यातील श्रीमती पुजा (अर्जदाराची पत्नी) ही कामा हॉस्पीटल येथे दाखल होती तिच्यावर उपचारा दरम्यान डॉक्टर,नर्स,कर्मचारी व संबंधित यंत्रणेने कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा अथवा निष्काळजीपणा केलेला नाही असा निर्णय दिलेला आहे. त्यामुळे गैरअर्जदाराविरुध्द कारवाई करता येत नाही.

या प्रकरणी आझाद मैदान ,पोलिस ठाणे मार्फत अंतिम निर्णय घेतला आहे का ? असे विचारले असता, याबाबत अतिम निर्णय घेण्यांत आलेला नाही असे उत्तर देण्यांत आले. त्याविषयी वरिष्ठांचे मार्गदर्शन घेऊन याबाबतीत अंतिम निर्णय घेऊन तो निर्णय कळविण्यांत यावा.

संबंधित प्रकरणाचे कागदपत्र चौकशी अधिकारी स्वतः बरोबर बदलीच्या ठिकाणी घेऊन जातात व नंतर ती कागदपत्रे संबंधित पोलिस स्टेशनला पाठवितात हे योग्य वाटत नाही. याबाबत सबंधित अति.पोलिस आयुक्त यांनी चौकशी करुन योग्यती कार्यवाही करावी. अर्जदारास हेही सांगण्यांत आले की, या संदर्भात पोलिस स्टेशनमध्ये असलेल्या सर्व कागदपत्राची त्यांना तपासणी करता येईल व त्यांना हवी असलेले कागदपत्र ते प्राप्त करुन घेऊ शकतात. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

## आ दे श

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

संबंधितांनी वर दर्शविल्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत यावी. आदेशाची प्रत अति.पोलिस आयुक्त (दक्षिण विभाग)यांनाही देण्यांत यावी.

(डॉ.सुरेश वि.जोशी)

दिनांक २० जानेवारी २००८ — राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००८/ ३५६५/०२**

**श्री.सुमीर मनोहरलाल डेबला,**
**अे २०२ गोदावरी,शांतीवन,**
**शांतीवन, बोरीवली (पूर्व) -- अपीलकार**
**मुंबई ४०० ०६६**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त --उत्तरवादी**
**परिमंडळ-२ यांचे कार्यालय**
**दक्षिण प्रादेशिक विभाग, नागपाडा,**
**भायखळा,मुंबई ४०० ०८**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलिस आयुक्त,**
**परिमंडळ-२ यांचे कार्यालय**
**दक्षिण प्रादेशिक विभाग, नागपाडा,**
**भायखळा,मुंबई ४०० ०८**

**-विवेचन-**

**श्री.सुमीर मनोहरलाल डेंबला,यांनी आयोगाकडे दि.२६ सप्टेंबर २००८ रोजी अपिल दाखल केलेले आहे. व्दितीय अपीलाची सुनावणी दि.२०.१.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. यापूर्वी या विषयी आयोगाने २-३ अपिले ऐकलेली आहेत.**

**अर्जदाराच्या माहिती मागणीच्या संदर्भात संबंधित वरिष्ठ पोलिस आयुक्त यांचा अहवाल पुढीलप्रमाणे आहे :-**

**मा.सर्वोच्च न्यायालयाने एका निवाडयाचे संदर्भात नेमलेल्यामा.राघवन समितीचे शिफारशीनुसार बळी पडलेला विद्यार्थी स्वतः पोलिसांकडे प्रथम खबरी अहवाल देऊ शकतो अशी शिफझरस केली आहे. परंतू अर्जदाराचे प्रकरणअतिविशिष्ठ प्रकरणात मोडते. अर्जदाराचे कर्थित रॅगिंग संबंधी गठीत चोकशी समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालात नमूद केले आहे की, It probably seems that their inter personal differences have beenfough under the disguise of ragging. This matter needs to be appropriately viewed in the light of apprehension of misuse of legal provision.**

**Mr. Sumir dembla has some personality and behavioral problem. It is felt that he needs urgent counselling and appropriate care. The same should be immidiately informed to his parents.**

तसेच सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलार्थी ज्या ग्रॅंट मेडिकल कॉलेजमध्ये विद्यार्थी आहेत त्या मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता यांनी सर जे.ज.मार्ग, पोलिस ठाणेस ३ पत्र पाठवून श्री.सुमीर डेंबला यांच्या तक्रारीबाबत रॅगिंगचा गुन्हयाची नोंद न घेण्याबाबत कारण त्यांचे मानसिक संतुलन बिघडले असून त्यांच्यावर मानसोपचार तज्ञांकडून उपचार चालू आहेत.

मात्र अपिलार्थी यांना हवी असलेली माहिती व त्यांच्यापुढे असलेल्या प्रश्नाची उत्तरे मिळावीत याबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करणे आवश्यक आहे असे आयोगास वाटते. मात्र माहितीचा अधिकार अधिनियमान्वये वरील परिस्थिती लक्षात घेता, माहिती देणे अशक्य आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

## आ दे श

अपील अमान्य करण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २० जानेवारी २००९

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००८/ ३५६६/०२**

**श्री.पार्वती ओमप्रकाश अग्रवाल**
**ई/बी/१०४,आश्रय हौ.सो.**
**मनिष पार्क, पंप हाऊस, अंधेरी पूर्व -- अपीलकार**
**मुंबई ४०० ०९३**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा शिक्षण निरिक्षक --उत्तरवादी**
**आय.वाय.कॉलेज कपाऊंड,**
**जोगेश्वरी पूर्व, मुंबई ४०० ०६०**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका (हिंदी माध्यम)**
**स्वीमी विवेकानंद हायस्कूल मेघवाडी,**
**जोगेश्वरी पूर्व, मुंबई**

**-विवेचन-**

**श्रीमती पार्वती ओमप्रकाश अग्रवाल यांनी आयोगाकडे दि.२.९.२००८ रोजी जे व्दितीय अपील सादर केले त्या अपिलाची सुनावणी दि.२०.१.२००९ रोजी घेण्यांत आली त्यावेळी अपिलकर्ते व जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य व शिक्षण निरिक्षक उपस्थित होते.**

**अर्जदाराच्या अर्जास अनुसरुन शाळेने काही माहिती दिली होती व त्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलीय आदेशात अपिलार्थी सुनावणीच्यावेळी उपस्थित राहिले नसल्यामुळे पोस्टाने माहिती पाठवावी असे निर्देश देण्यांत आले होते. ती माहिती अपिलार्थी शाळेत शिक्षक आहे त्यांना पाठविलेली आहे. तरीही अपिलार्थीचे समाधान झालेले दिसत नाही. तेव्हा ज्या मुद्याबाबत अजूनही समाधान झालेले नाी अशा मुद्याबाबत आयोगासमोरच अर्जदारास माहिती द्यावी, असे सांगण्यांत आलेले आहे. ही माहिती प्राचार्य यांनी सुनावणीच्यावेळेला दिली व त्यावर अपिलीय अधिकारी यांनी खातरजमा केलेली आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.**

**आ दे श**

**अपिल निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
**दिनांक २० जानेवारी २००८ राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/ ३५७०/०२

श्री.रुद्रपालसिंह खंडिये
माजी पो.शि/५३६, पो.स्टे.समुद्रपूर पोलिस दल वर्धा
रा.रुपर वर्धा इरिगेशन कॉलनी जवळ -- अपीलकार
पिंपरी (मेघे) सह जि.वर्धा ४४२००१

विरूद्ध

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जन माहिती अधिकारी --उत्तरवादी
पोलिस महासंचालक यांचे कार्यालय,
शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४००००१

**-विवेचन-**

श्री. रुद्रपालसिंह खंडिये यांनी आयेगाकडे दि.२६.८.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केले. त्या अपिलाची सुनावणी दि.२१.१.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अर्जदाराने उपस्थित केलेले मुद्दे व त्यावरील अभिप्राय हे पुढीलप्रमाणे आहेत:-

| मुद्दा | अभिप्राय |
|---|---|
| मुद्दा क्र.१<br>अपिलार्थी अर्ज सादर करतो की, पोलिस दल वर्धा जिल्हयाचे आस्थापनेवरील स्थाई पोशि/५३६ आहे. पोलिस महासंचालक म.रा.मुंबई यांचे निर्णय आदेश दि.३१.३.१९९४ अन्वये पोलिस स्टेशन मुद्रपूर जिल्हा वर्धा येथे दि.२.६.१९९४ हा सेवेत पुनःस्थापित झालेले पोशि/५३६ अपिलार्थी आहे | अभिप्राय नाही |
| मुद्दा क्र.२<br>पोलिस महासंचालक म.रा.मुंबई यांचे निर्णय आदेश दि.३१.३.१९९४ अन्वये बाहेर जिल्हयात बदली करण्याचे आदेश नाही. सबब अपिलार्थी मापोशि/५३६ नाही (याकरित सोबत जोडलेले सुचीतील परिशिष्ट २ व ३ चे अवलोकन करावे.) | अपिलार्थी यांनी नमुद केलेले आदेश हे त्यांच्या बदलीचे नसून ते त्यांच्या पुर्ननियुक्तीचे आहेत. सदरचे आदेश त्यांना दि.२.६.१९९४ रोजी बजावण्यांत आले आहेत. परंतू दरम्यानच्या कालावधीपूर्वी |

| | |
|---|---|
| | पो.उ.म.नि.नागपूर परि.नागपूर यांनी अपिलार्थी यांची बदली त्यांचे आदेश दि.५.९.१९९२ अन्वये वर्धा ते चंद्रपूर येथे करण्यांत आली होती. त्यामुळे अपिलार्थी यांनी दि.३.६.१९९४ पासून बदलीच्या ठिकाणी म्हणजेच चंद्रपूर येथे हजर होण्यासाठी कार्यमुक्त करण्यांत आले. त्याप्रमाणे चंद्रपूर येथे दि.९.६.१९९४ (म.पू.)हजर झालेले आहेत. |
| मुद्दा क्र.३<br>पोलिस अधिक्षक वर्धा यांनी दि.२.६.१९९४ पासून बदली झाली हा बहाना करुन या सबबी खाली अपिलार्थीचे वेतन व भत्ते अकारण रोखुन उन्नती दिलेली नाही. सेवेपासून वंचित ठेवले आहे. पोलिस अधिक्षक वर्धा यांचे सहीचा स्थानांतराचा व बाहेर जिल्हयात बदली वर जाण्यास कार्यमुक्तीचा सहीचा आदेश अपिलार्थीस आज पावेतो प्राप्त न झाल्याने अर्जदाराचा व अर्जदाराचे कुटूंबाचा जिवन मरणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. | अपिलार्थी यांना पो.अ.चंद्रपूर यांनी दि.२९.१२.१९९४ अन्वये दि.२.६.१९९४ पर्यतचे वेतन व भत्ते अदा केलेले आहेत. त्यामुळे त्यानंतरचे वेतन व भत्ते अपिलार्थी यांना दिले किंवा नाही. याबाबतची माहिती या कार्यालयाचे अभिलेखावर नाही. ती पो.अ.चंद्रपूर यांच्याकडून अर्जदाराने परस्पर उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक होईल. अपिलार्थी यांना बदलीचा आदेश दि.२.६.१९९४ रोजी बजाविला असल्याने तो प्राप्त झाला नाही या त्यांच्या म्हणण्यांत तथ्य दिसून येत नाही. |
| मुद्दा क्र.४<br>दि.२.६.१९९४ पासून आजपावेतो ठाणेदार समुद्रपूर व पोलिस अधिक्षक वर्धा यांनी अपिलार्थीस गैरहजेरीबद्दल मेमो नोटीस ज्ञापन तामील करुन पोच घेतलेली नाही. अपिलार्थीवर कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबित नाही | अपिलार्थी यांची बदली झाल्याने त्यांना बदलीच्या ठिकाणी दि.३.६.९४ रोजी कार्यमुक्त केल्याने ते वर्धा यांच्या आस्थापनेवर कार्यरतच राहात नाहीत. त्यामुळे ते पोलिस अधिक्षक वर्धा याच आस्थापनेवर गैरहजर किंवा कतर्व्यावर नाहीत, हा प्रश्नच निर्माण होत नाही. |
| मुद्दा क्र.५<br>अपिलार्थीने वरील परिच्छेद तीन ची महिती प्राप्त करण्याकरिता शासकिय माहिती अधिकारी पोलिस महासंचालक कार्यालय, म.रा.मुंबई यांचेकडे | अपिलार्थी यांना या कार्यालयाचे दि.२१.४.२००८ चे पत्रान्वये आवश्यक ती माहिती पुरविण्यांत आलेली आहे व सदर |

| | |
|---|---|
| दि.५.४.२००८ रोजी सनदशिर मार्गानेमाहितीसाठी अर्ज केला त्या दि.५.४.२००८ च्या पत्रान्वये शासकिय माहिती अधिकारी पो.म.स.कार्यालय यांचे दि.२१.४.२००८ अन्वये माहिती पाठविली व पत्रात माहितीने पिडीत झाले असल्यास अपीलीय प्राधिकारी तथा उप पो.उप महानिरिक्षक (प्रशासन)यांचेकडे अपील अर्ज करु शकता असे कळविले. याकरितासोबत जोडलेले सुचीतील परिशिष्ट ४१५ चे अवलोकन करावे | माहितीने व्यथित होत असतील तर त्यांनी प्रथम अपील करणेबाबत नियमान्वये कळविण्यांत आले आहे. त्यामुळे या मुद्दयाबाबत अभिप्राय नाहीत. |
| मुद्दा क्र.६<br>शासकिय माहिती अधिकारी पो.म.स.कार्यालय यांनी अपीलार्थीस खोटी, असत्य दिशाभूल व भ्रणित करणारी माहिती पुरविल्याने अपिलार्थी पिडीत झाला. सबब अपिलार्थीनी शासकीय माहिती अधिकारी पो.म.स. कार्यालय यांचेविरुध्द सत्य माहिती प्राप्त करण्याकरिता दि.१२.५.२००८ रोजी अपील अर्ज अपीलीय प्राधिकारी तथा पोउ.म.नि. (प्रशासन) पो.म.स. कार्यालय, मुंबई यांचेकडे सादर केला. याकरिता सोबत जोडलेल्या सूचीतील पवरि-६ चे अवलोकन करावे.<br>अपिलार्थी यांचे अपील अर्जाची माहिती न पुरविता अपीलीय प्राधिकारी तथा पो.उ.म.नि. (प्रशासन) मुंबई यांनी आपले आज्ञांकित कक्षात उपस्थित राहण्यास कळविले. याकरिता सोबत जोडलेले परि.७ चे अवलोकन करावे. सबब अपिलार्थी माहिती अभावि अपीलीय अधिकारी तथा पो.उ.म.नि. पो.म.स. कार्यालय,मुंबई यांचे कार्यालयात उपस्थित राहण्यास असमर्थ राहिला. यासोबत जोडलेले सुचीतील परि. ७ व ८ चेअवलोकन करावे.<br>अपिलार्थी अपीलीय प्राधिकारी तथा पो.उ.म.नि. (प्रशासन)पो.म.स. कार्यालय यांनी दि.८.८.२००८ चे त्यांचे पत्रान्वये पत्रात खोटे, असत्य दिशाभूल व भ्रमित करणारे कथन करुन आयपीओ क्र.रु.५०/- चा परत केला व या पत्रान्वये अपीलार्थी पिडीत झाला असेल तर राज्य माहिती आयुक्त म.रा.मुंबई यांचेकडे अर्ज सादर करु शकतो असे कळविले. या पत्रासह कोणतेही पत्र | अपिलार्थी यांना शासकिय माहिती अधिकारी यांनी या कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या माहिती अभिलेखावरुन माहितीच्या कायदा अंतर्गत त्यांचे प्रकरण येत नव्हते. तरी देखील त्यांना योग्य ते मुद्देनिहाय उत्तर दिले. त्यानंतर देखील त्यांनी पहिले अपील या कार्यालयाकडे सादर केले. त्यास अनुसरुन त्यांना प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी समक्ष मुलाखतीस बोलाविले परंतू ते मुलाखतीस हजर झाले नाहीत. त्यामुळे त्यांना या कार्यालयाचे अभिलेखावर उपलब्ध असलेली दि.३१.३.९४ या आदेशाची प्रत दि.८.८.२००८ अन्वये त्याचे अपील निर्णयान्वये उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे. त्यामुळे अपिलार्थी यांनी दिशाभूल केली किंवा त्यांना खोटी माहिती दिली. हा त्यांचा मुद्दा संयुक्तिक नाही. |

| | |
|---|---|
| जोडून न दिल्याने अपीलार्थीने निषेध नोंदवून दि.१५.८.२००८ ला प्राप्त केले. यासोबत जोडलेले सूचीतील परिच्छेद ८ चे अवलोकन करावे. | |
| मुद्दा क्र.७<br>अपीलार्थीस न्याय प्राप्ती करिता व त्यांचे दि.२.६.१९९४ पासून पो.अ.वर्धा यांनी सेवेपासून वंचीत ठेवून अकारण रोखलेले वेतन व भत्ते उन्नतीसह मिळविण्याकरिता (१) शासकिय माहिती अधिकारी पो.म.स. कार्यालय,मुंबई २. अपीलीय प्राधिकारी तथा पो.उ.म.नि. (प्रशासन)पो.म.स. कार्यालय मुं यांना हजरकरण्याचे अदा करण्याचे खालील नमुना अनुक्रमांक १ ते ५ पर्यत पत्र आदेश पुरविण्यांत आदेश व्हावेत अशी आपणांस विनंती करण्यांत येते.<br>१. अपीलार्थीचे पो.अ.वर्धा यांनीदि.३१.३.१९९४ नंतर व दि.२.६.१९९४ पूर्वी बाहेर जिल्हयात आपल्या सहीनिशी स्थलांतराचे आदेश.<br><br>२. अपीलार्थीस डयुटीवर हजर घेण्याकरिता दि.२.६.९४ ला ठाणेदार समुद्रपूर जि.वर्धा यांनी त्यांचे दि.२.६.९४ चे पत्रात नमूद केलेले पो.अ.वर्धा यांचे संदर्भिय पत्र कक्ष/१०/१९/ज/९४ दि.१.६.९४<br><br>३. अपिलार्थीस पो.अ.वर्धा यांनी आपल्या सहीनिशी बाहेर जिल्हयात स्थंलातर जाण्यास दि.३१.३.९४ नंतर व दि.३.६.९४ पूर्वी काढलेले कार्यमुक्त करण्याचा तामिल करुन अपीलार्थीची पोच घेतल्याचा पो.अ.वर्धा याच्या सहीचा आदेश | १. अपिलार्थी यांचे दि.५.९.९२ चे अदलीचे आदेश त्यांना ते सेवेत नसल्यामुळे पुनःस्थापित केल्याच्या दिनांकानंतर दि.२.६.९४ रोजी प्रत्यक्षात बजावण्यांत आलेले आहेत. सदर आदेशाची प्रत पुरविण्यांत हरकत नाही.<br>२. अपिलार्थी यांची बदली चंद्रपूर जिल्हयात झाल्याने त्यांना पुर्ननियुक्तीचे आदेश दि.२.६.९४ रोजी बजावण्यांत आले. व दुस-या दिवशी म्हणजे दि.३.६.९४ रोजी त्यांना त्यांची पूर्वी झालेल्या बदलीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी कार्यमुक्त केले आहे. त्यामुळे त्यांना वर्धा जिल्हयातील समुद्रपूर पोलिस स्टेशन येथे हजर करुन घेण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.<br><br>अपिलार्थी यांनी दि.५.९.९२ चे बदलीचे आदेश दि.२.६.९४ रोजी बजावण्यांत आले असून त्यांना दि.३.६.९४ मं पूर्व चंद्रपूर येथे हजर होण्याकरिता कार्यमुक्त केले. पोलिस अधिक्षक वर्धा यांनी या कार्यालयास कळविले आहे. |

| | |
|---|---|
| ४. पो.म.स.यांचे निर्णय आदेश दि.३१.३.९४ अपीलार्थीस दि.२.६.९४ ला पो.अ.चंद्रपूर मार्फत अपीलार्थीवर बजावलेले (यासह बजावलेले पत्राची) प्रत प्राप्त न झाल्याने दि.७.७.२००८ चे पत्र निषेध नोंदवून लाभार्थिने प्राप्त केले ते सुचीतील परि.८ चे अवलोकन करवे आदेश हजर करुन अर्जदारास अदा करण्यांत यावे.<br>५. पो.अ.वर्धा यांच्या आस्थापनेवर सेवेत स्थाई असलेला पोशि/५३६ रुद्रपालसिंग खंडिये अपिार्थी यास पो.अ. वर्धा यानी त्यांचे सहीचा १ सेवेतून कमी केल्याचा २.सेवेतून काढून टाकण्याचा ३. बाहेर जिल्हयात स्थलांतरावर जाण्यास कार्यमुक्त केल्याचा अपिलार्थीची पोच पावती घेऊन अदा केलेला आदेश.माजी संबंधिताकरिता हजर करण्याचे आदेश करावेत. अन्यथा अपीलार्थीस माजी पोशि/५३६ पो.स्टे.समुद्रपूर पो. दल वर्धा म्हणण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.<br><br>६.अपिलीय प्राधिकारी पो.उ.म.नि.(प्रशासन) पो.म.स.कार्यालय,मुंबई यांनी दि.८.८.२००८ चे पत्रासह पो.अ. वर्धा यांना तामिल केलेले दि.३१.३.९४ चे पत्र दि.१२.५.२००८ च्या पत्रान्वये देण्यांत येत असल्याचे कळविले. यासोबत जोडलेले सूचीतील परि.९ चे अवलोकन करावे. | ४. सदरचे आदेश अपिलार्थी यांना पो.अ. वर्धा यांनी दि.२.६.१९९४ रोजी बजावले असून त्याची प्रत देखील या कार्यालयाचे पत्र क्र.दि.८.८.२००८ रोजी त्यांना पुरविली आहे.<br><br>५.अपिलार्थी दि.३१.८.९४ पासून अनधिकृत गैरहजर राहिल्यामुळे त्यांना वारंवार हजर होण्याकरिता सूचना देऊनही पो.अ.चंद्रपूर येथे हजर झालेले नसल्याने त्यांच्यावर शिस्तभंगाविषयक कारवाई करुन त्यांना दि.२७.१.१९९७ अन्वये सेवेतून काढून टाकण्यांत आले. सदरचे आदेश त्यांनादि.३.२.९७ अन्वये अदा करण्यांत आले आहेत. तिन्ही आदेशाच्या प्रती अपिलार्थीस देण्यांत हरकत नाही. मात्र त्यांना दि.३.६.९४ रोजी बदलीच्या ठिकाणी कार्यमुक्त केल्याने वर्धा येथे हजर करुन घेण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.<br><br>अभिप्राय नाही. |
| ७.अपिलार्थी व कुटूंबाचा जीवन मरणाचा प्रश्न शासकिय माहिती अधिकारी/अपीलीय प्राधिकारी तथा पो.उ.म.नि.(प्रशासन)पो.म.स.कार्यालय मंबई यांचे खोटे व भ्रमित असत्य दिशाभूल करणारे दि.२१.४.२००८ व दि.८.८.२००८ चे कथन आहे. अपिलार्थीस न्याय प्राप्त करुन देण्याकरिता पो.अ.वर्धा यांना पो.म.स.कार्यालय | ७. मुद्दा क्र.१ चे अवलोकन करता अपिलार्थी यांना जनसंपर्क अधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेले उत्तर संयुक्तिक असल्याने अपिलार्थी यांचे म्हणणे संयक्तिक नाही. अपिलार्थी यांनी मागणी केलेली दि.३१.३.९४ च्या आदेशाची प्रत |

| | |
|---|---|
| मुंबई यांचेकडे खोटी माहिती पुरवून दि.३१.३.९४ चे आदेशाची पालन मुर्ती आजपर्यंत केलेली नाही हे उघडकीस आणण्याकरिता वरील परि.क्र.७ मध्ये नमूद केलेले पत्रे आदेश १ ते ५ पर्यतचे सत्य काय ते उघडकीस आणण्याकरिता हजर करण्याचा आदेश देऊन त्याच्या पोंच अपीलार्थीस अदा करुन पो.अ.वर्धा यांनी पोंच घेतलेल्या प्रती देण्यांत याव्यात.<br>८. परि.७ मधील १ ते ५ पर्यतची पत्रक आदेश हजर न केल्यास पो.अ.वर्धा यांनी स्वतःचे अधिकारात अपीलार्थी सेवेपासून दि.२.६.९४ पासून वंचित ठेवून अकारण वेतन व भत्ते व उन्नती रोखून पो.म.स.मुंबई यांचे दि.३१.३.९४ चे आदेशाची पालनपूर्ती केलेली नाही.अवलोकन केले हे स्पष्ट सिध्द होते.<br>सबब अपीलार्थीस न्याय मिळवून देण्याकरिता अपीलीय प्राधिकारी तथा पो.उ.म.नि. (प्रशासन)पो.म.स. कार्यालय,मुंबई यांना अपीलार्थी यांचे अकारण रोखलेले वेतनव भत्ते तसेच उन्नतीसह देऊन सेवेत रुजे करुन घेण्याचे पो.अ.वर्धा यांना आदेश देण्यांत यावेत,अशी आपणांस विनंती करण्यांत येते.<br>सबब न्यायाकरिता व परि.७ मधील १ ते ५ पर्यतची पत्र आदेश अपीलार्थीची पोच घेऊन अदा केलेले हजर करण्याचे आदेश देण्याकरिता अपील अर्ज सादर | बजावल्याची व पोच घेतलेल्याआदेशाची प्रत दिलेली आहे. त्यामुळे अपिलार्थी यांना दि.३.६.९४ नंतरचे भत्ते पोलिस अधिक्षक वर्धा यांनी देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. |

वरील अभिप्राय पाहता पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

**आ दे श**

अपील अमान्य करण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)

दिनांक २१ जानेवारी २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००८/ ३५७९/०२**

**श्री.विजय काशिराम चौहान**
**२ अे, सन ॲन्ड सी अपार्टमेंटस,**
**निअर रॉयल लेन, जुहूतारा रोड,** -- **अपीलकार**
**सांताक्रुझ (प), मुंबई ४०० ०४९**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपसचिव (१४-स)**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**मंत्रालय,मुंबई ४०० ०३२**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (१४स)** **उत्तरवादी**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**मंत्रालय,मुंबई ४०० ०३२**

**-विवेचन-**

**श्री. विजय काशिराम चौहान यांनी आयोगाकडे दि.२४.१०.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केले. त्या अपीलाची सुनावणी दि.२८.१.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी अपिलकर्ते, अपीलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**अपिलकर्त्याचा मुळ अर्जाबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय पुढीलप्रमाणे आहे:-**

**श्री. विजय काशिराम चौहान, २ ए, सन ॲन्ड सी अपार्टमेंटस, सहकार गृहनिर्माण संस्था लिमिटेड, रॉयल लेन जवळ, जुहू तारा रोड, सांताक्रुज (पश्चिम), मुंबई ४०० ०४९ यांनी दि.९.८.२००८ च्या पत्रात विविध मुद्दे उपस्थित करुन अर्ज मा.प्रधान सचिव (सहकार व पणन)यांना सादर करुन माहिती देण्याची विनंती केली. या पत्राच्या अनुषंगाने दि.२०.८.२००८ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये अर्ज दाखल करुन अशी विनंती केली की, दि.९.८.२००८ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये अर्ज दाखल करुन अशी विनंती केली की, दिनांक ९.८.२००८ रोजी सादर केलेल्या अर्जावर झालेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती आणि केलेल्या कार्यवाहीची प्रगती कळवावी. या अर्जाच्या अनुषंगाने श्री.ह.तु.जाधव, जन माहिती अधिकारी -नि-कक्ष अधिकारी, कार्यासन १४-स, सहकार, पणन ववस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय,मुंबई यांनी श्री.विजय काशिराम चौहान**

यांना क्रमांक कंमाअ ०८०८/प्र.क्र.३६५/१४-स दि.२९.८.२००८ व दि.८.९.२००८ अन्वये असे कळविले की, सदरचे पत्र दि.२६.८.२००८ रोजी आयुक्त,सहकार यांच्याकडे पाठविण्यांत आलेले आहे. म्हणून आपला दि.२०.८.२००८ रोजी माहितीच्या अधिकारान्वये सादर केलेला अर्ज आयुक्त, सहकार यांच्याकडे पाठविण्यांत आलेलाआहे. परंतू माहितीच्या अधिकाराच्या अनुषंगाने श्री.विजय काशिराम चौहान यांनी दि.१५.९.२००८ रोजी अपिल अर्ज सादर केला. सदरचा अर्ज दि.२३.९.२००८ रोजी प्राप्त झाला. या अर्जाच्या अनुषंगाने श्री.विजय काशिराम चौहान यांना दि.८.१०.२००८ रोजी दुपारी ३.०० वाजता सुनावणीसाठी उपस्थित राहण्यासाठी शासन पत्र क्र.केमाअ/१००८/प्र.क्र.४०७/१४-स, दि.१.१०.२००८ अन्वये सुचित करण्यांत आले. त्याप्रमाणे अपिलार्थी श्री. विजय काशिराम चौहान सुनावणीसाठी दि.८.१०.२००८ रोजी सुनावणीसाठी उपस्थित राहिले. श्री.विजय काशिराम चोहान यांनी अशी विनंती केली की, त्यांच्या दिनांक ९.८.२००८ च्या अर्जावर शासनाकडून कोणती काय्रवाही करण्यांत आली याबाबतची माहिति देण्यांत यावी.

श्री.विजय काशिराम चौहान यांचा दि.९.८.२००८ चा अर्ज शासन पत्र क्रमांक सगृयो २००८/प्र.क्र.३६३/१४-स दिनांक २६.८.२००८ अन्वये आयुक्त, सहकार यांच्याकडे योग्यत्या कार्यवाहीसाठी पाठविण्यांत आलेला आहे. त्यानंतर दि.२.९.२००८ रोजी आयुक्त, सहकार यांना स्मरणपत्र पाठविण्यांत आलेले आहे. तसेच पत्र क्रमांक-माअअ ०८०८/प्र.क्र.३६५/१४-स दिनांक २४.९.२००८ अन्वये अपर निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे यांनाही पत्राच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती श्री.विजय काशिराम चौहान यांना कळवावी व त्याबाबतची माहिती शासनास सादर करावी असे कळविण्यांत आले आहे. (त्या पत्राची प्रत श्री.विजय काशिराम चौहान यांनाही पाठविण्यांत आलेली आहे.) परंतू आयुक्त, सहकार यांच्या कार्यालयाकडून अजुनही सदरची माहिति श्री.विजय काशिराम चौहान यांना पुरविण्यांत आलेली नाही किंवा शासनास सादर करण्यांत आलेली नाही. म्हणून अपर निबंधक (गृह निर्माण)सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे यांना विनंती करण्यांत येते की, श्री.विजय काशिराम चौहान यांनी दाखल केलेल्या दि.९.८.२००८ च्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती श्री.विजय काशिराम चौहान यांना देण्यांत यावी व त्या माहितीची प्रत शासनास सादर करावी म्हणजे शासनाकडूनही श्री.विजय काशिराम चौहान यांना माहिती पुरविण्यांत येईल. तरी आयुक्त कार्यालयातून सदरची माहिती शासनास प्राप्त झाल्यानंतर श्री.विजय काशिराम चौहान यांना ही माहिती तात्काळ पुरविण्यांत येईल या आदेशासह श्री.विजय काशिराम चौहान यांचे अपिल निकाली काढण्यांत आले.

अर्जदाराच्या अपीलासंदर्भात सुनावणीच्या वेळेला असे सांगण्यांत आले की, अर्जदाराचे त्यांच्या सोसायटीच्या सभासदत्वाविषयी जो वाद आहे त्या संदर्भात उपनिबंधक,सहकारी संस्था, के-पश्चिम विभाग, मुंबई यांनी योग्यती चौकशी करुन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना अहवाल पाठविला आहे. त्या अहवालाची प्रतही अर्जदारास सुध्दा देण्यात आलेली आहे. त्या अहवालावरुन असे स्पष्ट नमूद केलेले आहे

**की, संस्थेची कार्यवाही ही संस्थेच्या सर्वसाधारण सभेत मंजूर झालेल्या ठरावानुसार असल्या कारणाने सदर ठरावाबाबत आक्षेप असल्यास सहकार न्यायालयात सदरचे ठरावास आव्हान करणे आवश्यक आहे. सुनावणीच्या वेळेला अर्जदाराने अशा प्रकारच्या केसेस सहकार न्यायालयात दाखल केल्याचे सांगितले आहे. आता प्रश्न अर्जदारास त्यांच्या मुळ अर्जानुसार माहिती देणे हा आहे. याबाबत अपिलीय अधिकारी ांनी त्यांच्या आदेशात शासनाकडूनही श्री.चौहान यांना माहिती पुरविण्यांत येईल असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे. याची अंमलबजावणी जन माहिती अधिकारी व उपसचिव तथा अपीलीय अधिकारी, सहकार पणन वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय,मुंबई यांनी १० दिवसाचे आंत करावी.**

**आ दे श**

**अपिल निकाली काढण्यांत येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि.जोशी)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**दिनांक २८ जानेवारी २००८**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्रमांक २००८/ ३५७८/०२**

**श्री. शेख शमा शेख अ. रहमान**
**अन्वरी हाऊस, अजीजपूरा,**
**बीड, ४३११२२ -- अपीलकार**

**विरूद्ध**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जन माहिती अधिकारी -- उत्तरवादी**
**उपसचिव**
**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग/असंक**
**मंत्रालय,मुंबई**

## -विवेचन-

**श्री. शेख शमा शेख अ. रहमान, बीड यांनी आयोगाकडे दिनांक २३.१०.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केलेले आहे. त्या अपिलाची सुनावणी दि.२८.१.२००९ रोजी घेण्यांत आली त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते व अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**अर्जदाराच्या अपिलासंबंधी सदरील प्रकरणाची संक्षिप्त माहिती पुढीलप्रमाणे सादर करण्यांत आली.**

**१. अर्जदाराने दि.११.५.२००७ च्या माहिती अर्जान्वये खालीलप्रमाणे माहिती मागविली होती. अर्जदाराचा अर्ज प्रत्यक्षात कार्यासनात दि.२१.६.२००७ रोजी प्राप्त झाला.**
**शाळेजवळ ३ ते ६ वर्षे वयोगटातील मुलांसाठी बालवाडया सुरु करुन मुलांचा शारिरीक बौध्दिक विकास करण्याबाबत सचिव, सलाम एज्युकेशन व अदर वेल्फेअर सोसयटी, बीड यांचा प्रस्ताव २००५-२००६ पासून पलंबित आहे. त्यांच्या मंजूरीसाठी काय अडचणी आहेत याची माहिती द्यावी.**
**अर्जदाराने मागविलेल्या माहितीबाबत व अर्जदारास कळविण्याच्या माहितीबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.**
**सलाम एजुकेशन ट्रस्ट, बीड यांनी ऊर्दू बालवाडया सुरु करण्याचा प्रस्ताव भेट शासनाकडे पाठविला होता. सदर प्रस्ताव दि.१४.२.२००५ च्या पत्रान्वये प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई येथे अभिप्रायासाठी पाठविण्यांत आला होता. बालवाडयांच्या परवानगी देण्याच्या बाबी शिक्षण संचालक (प्राथमिक ),पुणे यांच्याशी संबंधित असल्याचे नमूद करुन संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांनी दि.२५.२.२००५ च्या पत्रान्वये सदर प्रस्ताव शिक्षण संचालक (प्राथमिक),पुणे यांच्याकडे पाठविला. सदर प्रस्ताव शिक्षण संचालक (प्राथमिक),पुणे त्यांच्याकडून त्यांच्या शिफारस/अभिप्रायासह शासनास प्राप्त न झाल्याने अर्जदारास**

दि.३ जुलै,२००७ च्या पत्रान्वये शिक्षण संचालक (प्राथमिक),पुणे यांच्याशी संपर्क साधण्यास कळविण्यांत आले.

२. अर्जदाराने दि.४.९.२००८ च्या पत्रान्वये अपील केले.अर्जदाराच्या अपीलाच्या अनुषंगाने अर्जदारास अपीलीय अधिका-याने दि.२३.९.२००८ रोजी सुनावणीसाठी उपस्थित राहण्यास कळविले होते. तथापि अर्जदार सुनावणीसाठी उपस्थित राहिले नाहीत. अर्जदार उपस्थित न राहिल्याने त्यांचे अपिल निकाली काढण्यांत येत असल्याचे अर्जदारास दि.३०.९.२००८ च्या पत्रान्वये कळविण्यांत आले आहे.

३. अर्जदाराने मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांच्याकडे व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर प्रकरण सध्या या विभागातील प्राशि-२ कार्यासनाकडे दि.२२.८.२००८ रोजी हस्तांतर करण्यांत आले असून, या प्रकरणावर त्या कार्यासनामार्फत कार्यवाही करण्यांत येत आहे. हे प्रकरण हस्तांतर होईपर्यतची प्रकरणाची प्रगती दर्शविणारी माहिती (टिप्पणी विभागाच्या प्रती)अर्जदारास उपलब्ध करुन देता येईल. प्रकरणाच्या सद्य:स्थितीची माहिती अर्जदारास देण्याबाबत त्या कार्यासनास कळविण्यांत आले आहे.

जर अर्जदाराचे प्रकरण दुस-या कार्यासनाकडे हस्तांतरीत करण्यांत आले असले तर त्या दुस-या कार्यासनाच्या जन माहिती अधिकारी यांनी सद्य:स्थितीची माहिती देणे हे आवश्यक आहे. त्यामुळे त्या कार्यासनाने अर्जदारास १५ दिवसाचे आंत माहिती द्यावी. सदरील आदेशाची प्रत ही जन माहिती अधिकारी,प्रशि-२ तसेच अपीलीय अधिकारी, यांना सुध्दा पाठविण्यांत यावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आ दे श

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २९ जानेवारी २००८

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/ ३५९३/०२

श्री.हरेन मनसुलाल लालपुरा
प्राण कुंवरबाई विडो आूफ इश्वर वालजी,
इमारत क्र.१२/१४ खोली क्र.३ कामाठीपुरा -- अपीलकार
४थी गल्ली, एस.पी.रोड, मुंबई ४०० ०८

विरूद्ध

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त परि-३
मध्य नियंत्रण कक्ष,
बावळा कपाऊंड. भायखळा,
मुंबई २७

जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलिस आयुक्त उत्तरवादी
मध्य नियंत्रण कक्ष,
बावळा कपाऊंड. भायखळा,
मुंबई २७

-विवेचन-

श्री.हरेन मनसुखलाल लालपुरा, यांनी आयोगाकडे दि.३.११.२००८ रोजी सादर केलेल्या व्दितीय अपिलाची सुनावणी दि.२९.१.२००९ रोजी घेण्यांत आली. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदारास आग्रीपाडा पोलिस स्टेशनमध्ये दाखल केलेल्या तक्रार अर्जाबाबत घेतलेल्या जाबजबाबाची व चौकशीची माहिती पाहिजे होती. ही माहिती अर्जदारास उपलब्ध करुन देण्यांत आली होती. मात्र त्यामुळे त्यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांच्या प्रथम अपिलामध्ये अर्जदारास आग्रीपाडा पोलिस स्टेशनमध्ये अभिलेख्यावर उपलब्ध असलेली सर्व कागदपत्र अपिलार्थी यांना पुरविण्यांत आले होते. तसेच श्री. अमर सिंग यांच्या जाबजबाब आग्रीपाडा पोलिस स्टेशनमध्ये नोंद करण्यांत आलेले नसल्याने सदरची प्रत देता येत नसल्याचे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ग्राहय धरण्यांत आले, सदरील अपील या विरुध्दचे आहे. सुनावणीच्या वेळी नविन मुद्दा अपिलार्थी यांनी मांडलेला नाही. सदरील प्रकरण हे दिवाणी स्वरुपाची आहे हेही अपिलार्थी मान्य करतात. मात्र पोलिसानी कार्यवाही करावी असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. परंतू सदरील बाब दिवाणी स्वरुपाची असल्यामुळे दिवाणी कोर्टामध्ये दाद मागावी असे पोलिसांचे म्हणणे आहे. माहिती देण्याच्या बाबतीत

पोलिस स्टेशनमधील सर्व उपलब्ध माहिती दिलेली आहे असे आयोगाचे मत झालेले आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

## आ दे श

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ३० जानेवारी २००८

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३ ) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/ ३५९४/०२
अपील क्रमांक २००८/ ३५९५/०२

श्री. मकरंद दत्तात्रय सुगावकर,
१, श्री. साईनिकेतन को.हौ.सो. -- अपीलकार
मॅडोना कॉलनी , एस.व्ही. पी.रोड
सेंट फ्रान्सिस तंत्र शाळेजवळ,
बोरीवली (प), मुंबई १०३

विरूद्ध

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा जन माहिती अधिकारी
सिडनॅहम कॉलेज ऑफ कॉमर्स ॲन्ड इकोनॉमिक्स
बी रोड चर्चगेट, मुंबई ४०० ०२०

तथा सहायक पोलिस आयुक्त उत्तरवादी
मध्य नियंत्रण कक्ष,
बावळा कपाऊंड. भायखळा,
मुंबई २७

-विवेचन-

श्री. मकरंद सुगावकर यांनी आयोगाकडे दि.७.१०.२००८ रोजी सादर केलेले अपिल क्र. ३५९५ व दि.९.१०.२००८ रोजी अपिल क्र. ३५९४ सादर केलेले आहे. या दोन्ही अपिलाची सुनावणी दि.२९.१.२००९ रोजी घेण्यांत आली. अपिलार्थी अनुपस्थित होते व जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपिल क्रमांक ३५९४ अर्जदाराने उपस्थित केलेल्या मुद्यांवर दिलेले स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | उपस्थित केलेला मुद्दा | दिलेले स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १. | अभिलेखाची पाहणी करण्यास परवानगी दिली नाही. | दि.१९ व २० फेब्रुवारी २००८ चे अर्ज या महाविद्यालयात, मंत्रालयाकडून दि.२५ फेब्रुवारी २००८ रोजी मिळाले. सदर अर्जाप्रमाणे दि.११.१२ व १३ मार्च रोजी त्यांना सर्व मुळ फाईल पाहण्यास दिल्या. या तिन्ही दिवशी ते ४.३० ला येऊन ६.३० पर्यत थांबायचे त्यांनी त्यांना हव्या असलेल्या २३६ कागदपत्रांची निवड करुन त्याची यादी दिली व ते कागद घेण्यासाठी मला बोलविण्यात यावे |

| | | |
|---|---|---|
| | | असे कळवून कागदपत्रे घेऊन जाण्यास सांगितले. परंतू ते आले नाहीत. नंतर ९ मे २००८ रोजी पहिल्या अपिलीय अधिका-याकडे सुनावणी झाली त्याच दिवशी त्यांनी २४८ कागदपत्रे घेतली. (स्वतःच्या वैयक्तिक कार्यालयीन नस्तीची) राहिलेली कागदपत्रे त्यांनी स्विकारली नाहीत व तोंडी सांगितले की, वरील २३६ पृष्ठा व्यतिरिक्त अर्धवेळ अधिव्याख्यात्यांच्या नेमणूकीसंबंधी कागदपत्रे सुध्दा तयार ठेवावीत. त्यामध्ये पूर्णवेळ अधिव्याख्यातांची जी कागदपत्रे अनुक्रमांकासहित आहे ती वगळून द्यावीत व सर्वाची अनुक्रमाणिका तयार करुन देणे या अनुक्रमांकीत कागदामधुन पूर्णवेळ अधिव्याख्यात्यांची कागदपत्रे वगळल्याने त्यातून काही क्रमांकित पृष्ठे वगळली गेली. याच कागदपत्रात गोपनीय अहवाल (CR)असल्याने ते वगळण्यांत आले आहेत. तसेच काही कागदपत्राच्या दोन-दोन प्रती असल्याने त्यांनी वगळण्यास सांगितले व त्यावर त्यांनी आक्षेप घेतला आहे. या सगळया कार्यवाहीत अपिलार्थीच्या वेगवेगळया मागण्यांमुळे उशीर होत गेला. २२ मे रोजी दूरध्वनीव्दारे त्यांना कळविले की, कागदपत्रे तयार आहेत त्यावर त्यंनी विचारले की, आपण त्याप्रमाणे पत्र पाठविले आहे का? त्यानंतर लगेच दुस-या दिवशी २३ मे २००८ रोजी त्यांना कागदपत्रे घेऊन जाण्यासंबंधी पत्र पाठविले. २२ मे २००८ च्या दूरध्वीचे दरम्यान त्यांनी कळविले की, ते त्यांचे सवडीप्रमाणे येऊन कागदपत्रे घेऊन जातील व त्याप्रमाणे ते स्वतःच्या सवडीने येऊन दि.५.६.२००८ रोजी त्यांनी सदर कागदपत्रे स्विकारली. |
| २. | पुरविलेल्या कागदपत्रात गंभीर अनियमितता आहे. | कार्यालयात असलेल्या फाईल त्यांना पाहणी करण्यास दिलेल्या होत्या. एखादया फाईलमधील पाठीमागच्या कागदास नजर चुकीने क्रमांक दिलेला असणे किंवा एकच क्रमांक दोन कागदास असणे हे गैर नाही. मुद्दा आहे त्यांना उपलब्ध असलेले व त्यांनी मागितलेले कागद दाखविणे व ती कार्यवाही या कार्यालयाने पूर्ण केलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | प्रभारी प्राचार्य हे राजपत्रित अधिकारी असतात त्यामुळे त्यांनी ती कागदपत्रे पुरविली आहेत. सदर कागदपत्रे खरी असण्यासाठी (Attestation) स्वाक्षरी केलेली आहे ते कृत्य बरोबर व योग्य आहे. फाईलमध्ये असलेले कागद जसे होते तसे आपणांस दिलेले आहेत. ते अस्पष्ट असू शकतात. अस्पष्ट कागद स्पष्ट करता येत नाहीत. जसे होते तसे कागद त्यांना पाहण्यांत दिलेले आहेत. |
| ३. | कागदपत्रे ९७ दिवस उशिरा दिली | दि.१९, २० फेब्रुवारी २००८ चे अर्ज या महाविद्यालयात मंत्रालयाकडून दि.२५ फेब्रुवारी २००८ रोजी मिळाले. सदर अर्जाप्रमाणे दि.११.१२ व १३ मार्च २००८ रोजी त्यांना सर्व मुळ फाईल पाहण्यास दिल्या. या तिन्ही दिवशी ते ४.३० ला येऊन ६.३० पर्यत थांबायचे त्यांनी, त्यांना पाहिजे असलेल्या २३६ कागदपत्रांची निवड करुन त्यांची यादी दिली व ते कागद घेण्यासाठी मला बोलाविण्यांत यावे असे कळवून ते गेले २७ मार्च २००८ रोजी त्यांना पत्र पाठवून कागदपत्रे घेऊन जाण्यास सांगितले परंतू ते आले नाहीत. नंतर ९ मे २००८ रोजी पहिल्या अपिलीय अधिका-याकडे सुनावणी झाली त्याच दिवशी त्यांनी २४८ कागदपत्रे घेतली (स्वतःच्या वैयक्तिक कार्यालयीन नस्तीची)राहिलेली कागदपत्रे त्यांनी स्विकारली नाहीत व तोंडी सांगितले की वरील २३६ पृष्ठ व्यतिरिक्त अर्धवेळ अधिव्याख्याताच्या नेमणूकीसंबंधी कागदपत्रे सुध्दा तयार ठेवावीत. त्यामध्ये पूर्णवेळ अधिव्याख्यात्यांची जी कागदपत्रे अनुक्रमांकासहित आहे ती वगळॅन द्यावीत व सर्वाची अनुक्रमाणिका तयार करुन देणे या अनुक्रमांकीत कागदामधुन पूर्णवेळ अधिव्याख्यातांची कागदपत्रे वगळल्याने त्यातून काही क्रमांकित कागदपत्रे वगळली गेली. याच कागदपत्रात गोपनीय अहवाल (CR)असल्याने ते वगळण्यांत आले आहेत. तसेच काही कागदपत्राच्या दोन-दोन प्रती असल्याने त्यांनी वगळण्यास सांगितले आहे व त्यावर आक्षेप घेतला आहे. या सगळया कार्यवाहीत अपिलार्थीच्या वेगवेगळया मागण्यांमुळे उशीर होत गेला. २२ मे रोजी दूरध्वनीव्दारे |

| | | |
|---|---|---|
| | | त्यांना कळविले की, कागदपत्रे तयार आहेत त्यावर त्यांनी विचारले की, आपण त्याप्रमाणे मला पत्र पाठविले आहे का? त्यानंतर लगेच दुस-या दिवशी २३ मे २००८ रोजी त्यांना कागदपत्रे घेऊन जाण्यासंबंधी पत्र पाठविले. २२ मे २००८ च्या दूरध्वनीचे दरम्यान त्यांनी कळविले की,ते त्यांचे सवडीप्रमाणे येऊन कागदपत्रे घेऊन जातील व त्याप्रमाणे ते त्यांच्या स्वतःच्या सवडीने येऊन दि.५.६.२००८ रोजी त्यांनी सदर कागदपत्रे स्विकारली. दि.११,१२ व १३ मार्च २००८ रोजी त्यांना सर्व संबंधित फाईल दाखविल्या आहेत. त्यामुळे माहितीचे अधिकार नियमाप्राणे माहिती ३० दिवसांचे आत त्यांना दिलेली आहे. |
| ४. | दिनांक १०.४.२००८ च्या अर्जाप्रमाणे परिपूर्तता झालेली नाही | वरील मुद्दा क्र.१ प्रमाणे |
| ५. | झेरॉक्स प्रती व्यवस्थित नव्हत्या, पत्रांना वेगळे क्रमांक होते. प्र. प्राचार्यानी स्वाक्षरी केली वगैरे मुद्दे उपस्थित केले आहेत | दिलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती सर्व व्यवस्थित दिल्या आहेत. प्र.प्राचार्य जरी असले तरी ते महाविद्यालयातील वरिष्ठ व राजपत्रित अधिकारी आहेत. त्यामुळे त्यांना स्वाक्षरी करण्याचा अधिकार आहे. पत्रांना जावक क्रमांक असतो तो त्या दिवसांचे नोंदीप्रमाणे बरोबर आहे. प्र.प्रबंधक यांनी लिहिलेले पत्र हे माहिती घेऊन जाण्यासाठी लिहिले होते व ते बरोबर आहे. हे सर्व त्यांचे मुद्दे माहितीचे अधिकाराप्रमाणे गैरलागू आहेत |
| ६. | शासनाचे कार्यालय नियमांचे उल्लंघन करुन अपिलार्थीना त्रास देतात | नेमणूक केलेली नसताना अपिलार्थी व्याख्याने घेत होते.त्यास प्रतिबंध केल्याने, त्यांना त्रास दिला असे ते भासवित आहेत. वास्तवात ते घेत असलेली व्याख्याने हे गैरकृत्य होते. याची जाणीव दिल्याने ते विचलित होऊन त्यांनी वेगवेगळे आक्षेप घेतले आहेत. |
| ७. | आयुक्तांना केलेली विनंती माहितीचा अधिकार अधिनियम १९(८) (ब) खाली कार्यवाही करण्यांत यावी. | सत्य परिस्थिती लक्षात घेता अपिलार्थीना हवी असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली सर्व माहिती व कागदपत्रे दिली आहे शिवाय झेरॉक्स प्रती त्यांना विनामुल्य दिल्या आहेत. शिवाय नियमाप्रमाणे त्यांनी अपिल करताना द्यायचे असते ते प्रतिज्ञापत्र दिलेले नाही अशी त्रुटी असतनाही त्यांनी मागणी केलेली सर्व माहिती त्यांना |

| | | |
|---|---|---|
| | | दिलेली आहे. कारण, माहितीचे अधिकार अधिनियम अस्तित्वात आल्यावर शासकीय कार्यालय म्हणून मागितलेली माहिती देणे हा नियम झालेला आहे. मागितलेली माहिती दिल्याने अपिलार्थीने केलेली विनंती मान्य करु नये असे वाटते. |

तसेच अपिल क्र.३५९५ बाबत आयोगाने या अगोदरही श्री. सुगावकर यांचे म्हणणे ऐकलेले आहे.

अर्जदाराने त्यांना हवी असलेली माहितीच्या कागदपत्राचे अवलोकन केलेले आहे. त्यातील कोणते कागदपत्र पाहिजे आहेत व आतापर्यंत ज्यांना १०००पृष्ठापेक्षा जास्त माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिलेली आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियमाचे पालन करण्यांत अनाठायी कुसूर झाल्याचे दिसून येत नाही. अर्जदाराने जर त्यांना पार्ट टाईम लेक्चरर म्हणून नियुक्ती होत नसल्याची भावना असेल तर त्यांनी योग्यत्या प्राधिकरणाकडे दाद मागणे उचित राहिल असे आयोगास वाटते. सबब पुढील आदेश देण्यांत येत आहेत.

## आ दे श

वरील दोन्ही अपीले अमान्य करण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक २८ जानेवारी २००९